दिन विशेष...

१७३७ : थोरले बाजीराव यांनी दिल्लीवर चाल करून मोगलांचा पराभव करून दिल्लीत मराठ्याचे वर्चस्व प्रस्थापीत केले.

१९८४ : स्वातंत्र्य संग्रामातील थोर नेते भाऊसाहेब रानडे यांचे निधन

महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ७४,५६३.९२ -१,४७०.५० (१.९३%)
डॉलर ₹ ९२.३६

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३८ | २० |
| दिल्ली | २९ | १९ |
| मुंबई | ३४ | २३ |
| नागपूर | ३८ | २१ |
| पुणे | ३६ | १८ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | शनिवार , दि. २८ मार्च २०२६ | वर्ष २ रे | अंक १३६ किंमत : ५ रु. | पाने ४


**सुविचार**

बोलताना विचार करून बोला, बोलून विचारात पडू नका

सूर्योदय - सूर्यास्त
स.-६:३७ संध्या-६:३७

**सोने - चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,६१,६३५/- २,७५,०००/-

## थोडक्यात

### बीडमध्ये दोन कारची समोरासमोर धडक; तिघे जागीच ठार

**बीड ।** येथे दोन कारची समोरासमोर जोरदार धडक झाली. या अपघातात तीन जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर, एक जण गंभीर जखमी झाल्याची माहिती मिळत आहे. ही घटना केज तालुक्यातील अहमदपूर-अहमदनगर महामार्गावर शुक्रवारी रात्री ११ वाजेच्या सुमारास घडली. यात अमित दिलीपराव कोमटवार (वय ३५, रा. दिंद्रुड, माजलगाव), परमेश्वर नवनाथ काळे ( रा. खांडे पारगाव, बीड), गणपत नारायण गोरे (वय ४७, रा. सामनापूर ता. जि. बीड) अशी अपघातात मृत्यू झालेल्या व्यक्तींची नावे आहेत.

### १ जानेवारी २०११ पूर्वीची अतिक्रमणे होणार नियमित

**मुंबई ।** राज्यातील गरीब आणि गरजू कुटुंबांना हक्काचे घर उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. १ जानेवारी २०११ पर्यंत सरकारी जमिनीवर झालेली आणि सध्या अस्तित्वात असलेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही घोषणा केली. महसूल विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला आहे.

### शिक्षक भरतीचा निकाल फिरला!

**मुंबई ।** राज्यात सन २०२२ मध्ये झालेल्या शिक्षक भरतीच्या सर्व निवड याद्या नव्याने जाहीर करा, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. या निर्णयामुळे शिक्षक पात्रता परीक्षेत ५५ टक्के गुण मिळवून पात्र ठरलेल्या मागासवर्गीय उमेदवारांना मेरिटच्या आधारे सर्वसाधारण प्रवर्गातील जागांवर संधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. शिक्षक पात्रता परीक्षेत ५५ टक्के गुण असणाऱ्या मागासवर्गीय उमेदवारांना खुल्या गटाच्या मेरिटमध्ये जाण्यास मज्जाव करण्यात आला होता.

# जम्मू-काश्मीर विधानसभेत आमदारांमध्ये हाणामारी

## भाजप नेत्यांनी राहुल गांधींवर केलेल्या टिप्पणीवरून झाला वाद



वृत्तसंस्था । श्रीनगर

**जम्मू-काश्मीर विधानसभेत शुक्रवारी इराणचे माजी सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या निधनावरून निदर्शने झाली. नॅशनल कॉन्फरन्सचे नेते खामेनी यांचा फोटो घेऊन सभागृहात पोहोचले आणि त्यांच्या समर्थनार्थ घोषणाबाजी केली.त्यामुळे सभागृहात काँग्रेस आणि भाजप नेत्यांमध्ये धक्काबुक्की झाली.**

हा वाद भाजप नेत्यांनी राहुल गांधींवर केलेल्या टिप्पणीवरून झाला होता. काँग्रेस आमदार इरफान हाफिज पंतप्रधान नरेंद्र मोदींविरोधात घोषणाबाजी करत होते.

प्रत्युत्तरादाखल भाजप आमदार युद्धवीर सेठी म्हणाले, राहुल गांधी पप्पू आहेत. यानंतर दोन्ही नेत्यांमध्ये हाणामारी सुरू झाली. तर, इराण युद्धावर मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला म्हणाले, इराणवर हे युद्ध लादले गेले. मानवतेची हत्या झाली आहे.

पंतप्रधान मोदी आणि राहुल गांधी यांच्यावरील टिप्पणीवरून भाजप आणि काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाली.


पंतप्रधान मोदी आणि राहुल गांधी यांच्यावरील टिप्पणीवरून भाजप आणि काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाली.

जम्मू-काश्मीर विधानसभेत इराणचे सर्वोच्च नेते खामेनी यांचा फोटो घेऊन निषेध प्रदर्शन करणारा नॅशनल कॉन्फरन्सचे आमदार म्हणाले, आम्ही इराणसोबत आहोत. नॅशनल कॉन्फरन्सचे आमदार तन्वीर सादिक म्हणाले, आम्ही इराणसोबत उभे आहोत. आमचा पक्ष आणि जम्मू-काश्मीर सरकार त्यांच्यासोबत उभे आहे. जसे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी मागील वेळी नागरी (पान २ वर)

### इराणसाठी ₹१८ कोटी निधी

**काश्मीर खोऱ्यात इराणच्या समर्थनार्थ कोट्यवधी रुपयांचा निधी जमा करण्यात आला आहे. यामुळे देशाच्या सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. या पैशांचा वापर दहशतवादी निधीसाठी होऊ शकतो अशी भीती व्यक्त केली जात आहे. सूत्रांनुसार, आतापर्यंत सुमारे ₹१८ कोटींचा निधी जमा करण्यात आला आहे. यापैकी ८५% रक्कम शिया समुदायाने दान केली आहे. काश्मीरमधील बडगाम हा शियाबहुल भाग आहे. येथून सुमारे ₹९.५ कोटी जमा करण्यात आले आहेत.**

# राज्यात लॉकडाऊन लागणार नाही अफवा पसरवणाऱ्यांवर गुन्हे दाखल होणार



वृत्तसंस्था । मुंबई

**अमेरिका-इस्रायल आणि इराण युद्धाचा फटका जगातील अनेक देशांना बसत आहे. अद्यापही हे युद्ध पूर्णपणे थांबलेलं नाही. या युद्धामुळे जागतिक बाजारात कच्च्या तेलासह नैसर्गिक वायूचा तुटवडा निर्माण होत असल्याचा दावा केला जात आहे. तसेच मध्य पुर्वेतील तणावाच्या पार्श्वभूमीवर सध्या सोशल मीडियावर लॉकडाऊनबाबत काही अफवा पसरवल्या जात असल्याचं समोर आलं आहे.**

त्यामुळे बाजारपेठांत आणि शहरांमधील छोटे दुकानदार लॉकडाऊनच्या चर्चेने चिंतेत आहेत. एवढंच नाही तर या लॉकडाऊनच्या (पान २ वर)

लॉकडाऊन लागणार नाही हे केंद्र सरकारने स्पष्ट केलेलं आहे. मात्र, जे लोक अशा प्रकारच्या अफवा पसरवत आहेत त्या सगळ्यांवर फौजदारी कारवाई केली जाईल. मी स्पष्टपणे सांगतो की अशा प्रकारची खोटी माहिती सोशल मीडियावर शेअर करणं गुन्हा ठरेल. अशा गुन्ह्यातील प्रत्येकावर फौजदारी कारवाई होऊ शकते.

# खरात प्रकरणात रुपाली चाकणकर यांची 'दलालाची' भूमिका : रुपाली ठोंबरे

## चाकणकर यांना सहआरोपी करण्याची मागणी



वृत्तसंस्था । नाशिक

**भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात रुपाली चाकणकर या दलाल म्हणून कार्यरत होत्या. पीडित महिलांच्या अश्लील चित्रफिती समाज माध्यमात येत असतांना या प्रकरणात अडकलेल्या चाकणकर आणि त्यांच्या कुटुंबियांच्या चित्रफिती समोर आणा, चाकणकर यांना सहआरोपी करा, अशी मागणी झाशीची राणी प्रतिष्ठानच्या अध्यक्षा रुपाली ठोंबरे यांनी केली.**

भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात रुपाली चाकणकर या दलाल म्हणून कार्यरत होत्या. पीडित महिलांच्या अश्लील चित्रफिती समाज माध्यमात येत असतांना या प्रकरणात अडकलेल्या चाकणकर आणि त्यांच्या कुटूंबियांच्या चित्रफिती समोर आणा, चाकणकर यांना सहआरोपी करा, अशी मागणी झाशीची राणी प्रतिष्ठानच्या अध्यक्षा रुपाली ठोंबरे यांनी केली. खरात प्रकरणाबाबत पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांची शुक्रवारी रुपाली ठोंबरे यांनी भेट घेतली. या भेटीनंतर ठोंबरे (पान २ वर)

# उपमुख्यमंत्र्याला न्याय मिळत नाही?

## अजितदादांच्या अपघाताचा मुद्दा संसदेत मांडला

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**राज्याचे दिवंगत नेते व माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताला जवळपास दोन महीने पूर्ण झाले आहेत. मात्र, अद्यापही या घटनेचा तपास सुरू आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार हे प्रकरणाच्या चौकशीसाठी अनेकांच्या भेटी घेत आहे.**

**सुप्रिया सुळे यांनी झीरो अवरमध्ये अजित पवारांच्या अपघाताचा विषय मांडला.**



याबाबत रोहित पवारांनी ट्विट करत माहिती दिली आहे. ते म्हणाले, अजितदादांना न्याय मिळावा यासाठी आज खासदार सुप्रियाताई यांनी झीरो अवरमध्ये अत्यंत तळमळीने आणि प्रभावी शैलीत संसदेत या विषयांची मांडणी करून अजितदादांना न्याय देण्याची मागणी सरकारकडे केली. सरकारने याची गांभीर्याने दखल घेऊन (पान २ वर)

रोहित पवारला एक एफआयआर दाखल करायला जंग-जंग करावी लागली. एफआयआर दाखल करा आणि आमच्या काकांना न्याय मिळू द्या. या देशाच्या एवढ्या मोठ्या डेप्युटी चीफ मिनिस्टरचा जेव्हा एवढा मोठा अपघात होतो आणि त्याचा एफआयआर दाखल होत नाही, तर सर्वसामान्य लोकांनी जायचे कुठे?

# लाडक्या बहिणींचा फेब्रुवारी महिन्याचा हप्ता जमा होण्यास सुरुवात

## महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरेंनी दिली माहिती

वृत्तसंस्था । मुंबई

**लाडक्या बहिणींच्या खात्यात फेब्रुवारी महिन्याच्या हप्त्याचे पैसे जमा होण्यास सुरूवात झाली आहे. राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी एक्स अकाऊंटवरून ट्वीट करत माहिती दिली आहे.**

ट्वीटमध्ये आदिती तटकरे यांनी म्हटले आहे की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा फेब्रुवारी महिन्याच्या सन्मान निधी वितरणाची प्रक्रिया सुरू झाली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील सर्व पात्र लाभार्थ्यांना फेब्रुवारी महिन्याचा सन्मान निधी वितरित करण्याची तांत्रिक प्रक्रिया आजपासून सुरू करण्यात आली आहे. पुढील २-३ दिवसांत सर्व पात्र लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात हा सन्मान निधी जमा होणार आहे. त्यामुळे लाभार्थी महिलांना मोठा दिलासा मिळाला आहे.

महायुती सरकारचा दृढ निश्चय, आदरणीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब, आदरणीय उपमुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे साहेब, आदरणीय उपमुख्यमंत्री सुनेत्राकाकी पवार यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन व महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींचा दृढ विश्वास या बळावर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची दमदार वाटचाल यापुढेही अशीच सुरू राहणार हा मला विश्वास आहे, असेही अदिती तटकरे म्हणाल्या आहेत. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही महायुती सरकारची महत्वाकांक्षी योजना आहे. या योजनेअंतर्गत दर महिन्याला लाभार्थी महिलांच्या




खात्यावर १५०० रुपये जमा केले जातात. महिला व बाल विकास विभागाकडून ही योजना चालवली जाते. जानेवारी महिन्याच्या हफ्त्याचे पैसे २३ फेब्रुवारीला देण्यात आले होते. त्यानंतर सर्व लाडक्या बहिणींचे लक्ष फेब्रुवारीचा हफ्ता कधी येणार याकडे लागले होते. अखेर आजपासून या हप्त्याचे १५०० रुपये वितरित करण्यास सुरुवात झाली आहे.

# पेट्रोल, डिझेलवरील उत्पादन शुल्कात प्रत्येकी १० रुपयांची घट

## केंद्र सरकारच्या महसुलात घट होईल

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**पश्चिम आशियातील युद्धामुळे जागतिक पातळीवर कच्च्या तेलाचे व इंधनाचे दर वाढले आहेत. त्यामुळे ऑइल मार्केटिंग कंपन्यांवर आर्थिक भार आला आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने पेट्रोल व डिझेलवरील विशेष अतिरिक्त उत्पादन शुल्कात (स्पेशल ॲडिशनल एक्साइज ड्युटी) प्रत्येकी दहा रूपयांची घट केली आहे.**



देशभरातील पेट्रोल पंपांवर विकल्या जाणाऱ्या पेट्रोल व डिझेलचे भाव वाढू नये, म्हणून केंद्र सरकारने हा महत्वाचा निर्णय घेतला आहे. केंद्र सरकारने घेतलेल्या या निर्णयाचा परिणाम पेट्रोल, डिझेलच्या किंमतीवर कसा होईल, तसेच केंद्र सरकारच्या महसूलात किती घट होईल ते सविस्तर जाणून घेऊयात. रेग्यूलर पेट्रोलवर प्रति लीटर २१.९ रूपये, रेग्यूलर डिझेलवर प्रति लिटर १७.८ रूपये एकूण उत्पादन शुल्क आकारले जात होते. त्यात प्रत्येकी दहा रूपयांची घट होऊन आता पेट्रोलवर ११.९ रूपये तर डिझेलवर ७.८ रूपये एकूण उत्पादन शुल्क आकारले जाणार आहे. पेट्रोल व डिझेलवर उत्पादन शुल्काशिवाय ॲग्रीकल्चर इन्फ्रास्ट्रक्चर (पान २ वर)

# महसूल विभागातील १३ अतिगंभीर प्रकरणांत दोषी अधिकाऱ्यांना सक्तीची रजा

## जमिनीचा वर्ग, क्षेत्रफळ आणि भोगवटदारांमध्ये बेकायदेशीर केले बदल

प्रतिनिधी । पुणे

**जिल्ह्यातील जमीन महसूल अभिलेखांमध्ये मोठ्या गैरव्यवहाराचा पर्दाफाश झाला असून, राज्य शासनाने याप्रकरणी कठोर पावले उचलली आहेत. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम १५५ चा गैरवापर करून जमिनीचा वर्ग, क्षेत्रफळ आणि भोगवटदारांमध्ये बेकायदेशीर बदल केल्याच्या गंभीर तक्रारीनंतर सखोल चौकशी करण्यात आली.**

या चौकशीसाठी नाशिक विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती नेमण्यात आली होती. समितीने तपासलेल्या २,२२७ प्रकरणांपैकी १३



प्रकरणे अतिगंभीर असल्याचे समोर आले. या प्रकरणांमध्ये जाणीवपूर्वक कायद्याचा गैरवापर करून मालकी हक्कांमध्ये फेरफार करण्यात आल्याचे समितीने स्पष्ट केले. दरम्यान, या प्रकरणाची दखल राज्य विधानपरिषदेत घेण्यात आली होती. लक्षवेधी सूचनेवरील चर्चेदरम्यान महसूल मंत्र्यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाईचे आश्वासन दिले होते. (पान २ वर)

### या अधिकाऱ्यावर झाली कारवाई

या कारवाईमध्ये गीता गायकवाड (अपर तहसीलदार), ज्योती देवरे (अपर तहसीलदार), रविंद्र सबनीस (तहसिलदार, जुन्नर), व्यंकटेश भोसले ( मंडळ अधिकारी, जुन्नर), प्रल्हाद पाटील (महसूल सहायक), श्रीकांत पाटील ( विशेष भूसंपादन अधिकारी), मलाप्पा तम्मा ढाणे (मंडळ अधिकारी), मधुसुधन बर्गे (तहसिलदार, मावळ), मारुती चोरमले (मंडळ अधिकारी), अश्विनी व्यंकटराव गोरे (ग्राम महसूल अधिकारी), सुजाता गोविंदराव रच्चेवार (ग्राम महसूल अधिकारी), श्रीकांत कुलकर्णी (लिपिक), सुरेश जगताप (मंडळ अधिकारी), ज्ञानेश्वर भराटे (ग्राम महसूल अधिकारी), संजय पाटील यांचा समावेश आहे.

# हॉटेल आणि औद्योगिक क्षेत्रातील गॅस टंचाई दूर होणार

वृत्तसंस्था । दिल्ली

**पश्चिम आशियातील वाढत्या युद्धजन्य तणावामुळे कच्च्या तेलाच्या किमतीत होणारी वाढ आणि इंधन टंचाईवर मात करण्यासाठी गुरुवारी वित्त मंत्रालयाने पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात मोठी कपात जाहीर केली असून, औद्योगिक क्षेत्राला दिलासा देण्यासाठी कमर्शियल एलपीजीचा पुरवठा ७० टक्क्यांपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे.**

जागतिक बाजारात कच्च्या तेलाचे दर भडकल्याने तेल कंपन्यांवर येणारा ताण कमी करण्यासाठी सरकारने उत्पादन शुल्कात कपात केली आहे. पेट्रोलवरील उत्पादन शुल्क १३ रुपयांवरून थेट ३ रुपये प्रति लीटर करण्यात आले आहे. डिझेलवरील १० रुपये प्रति लीटर असलेले उत्पादन शुल्क पूर्णपणे रद्द (शून्य) करण्यात आले आहे. वित्त मंत्रालयाने २६ मार्च रोजी यासंदर्भातील अधिसूचना जारी केली असून, हे नवे दर तातडीने लागू झाले आहेत.कमर्शियल एलपीजी कोट्यात २० टक्क्यांची वाढ युद्ध सुरू झाल्यानंतर कमर्शियल (पान २ वर)

## संपादकीय

### अमेरिकेची दादागिरी!

गेल्या शतकात अमेरिकेने ९६ हून अधिक देशांमध्ये लष्करी कारवाई केली. जगभर ८०० हून अधिक लष्करी तळ उभारले. यातूनच अमेरिकेची युद्धपीपासू वृत्ती व ङ्गजागतिक पोलीसफम्हणून स्वतःला सादर करण्याची प्रवृत्ती आजही दिसते. १९७१ मध्ये भारतावर अमेरिकेची लष्करी कारवाई होऊ शकली असती. अमेरिकेचे सातवे आरमार बंगालच्या उपसागरापर्यंत पोचले होते. पण तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांची मुत्सद्देगिरी आणि सोव्हिएत युनियनचे तत्कालीन प्रमुख लिओनीद ब्रेझनेव्ह यांनी अमेरिकेला दिलेला इशारा यामुळे या यादीत भारताचा समावेश झाला नाही. अमेरिकेने ङ्गजागतिक पोलीसफ म्हणून स्वतःला सादर केले, पण प्रत्यक्षात आर्थिक नियंत्रण आयएमएफ, वर्ल्ड बँक, डॉलरचे वर्चस्व, लष्करी तळ आणि सत्ताबद्दल यांच्याद्वारे जगावर अधिकार गाजवला ही वस्तुस्थिती आहे. त्याचबरोबर उर्वरित जगापासून दोन समुद्र दूर असलेल्या अमेरिकेने युद्ध आपल्या भूमीपासून दूर ठेवले. जपानने पर्ल हार्बरवर हल्ला केला होता. त्याची शिक्षा म्हणून जपानवर दोन अणुबॉम्ब टाकले. दुसऱ्या महायुद्धानंतर जगाची राजकीय रचना पूर्णपणे बदलली. युरोप आणि आशियातील युद्धाने ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी आणि जपानसारख्या शक्ती कमकुवत झाल्या. अमेरिका मात्र युद्धातून आर्थिक आणि लष्करीदृष्ट्या अबाधित राहिली. अमेरिकेकडे जगातील निम्मे औद्योगिक उत्पादन, तीन-चतुर्थांश भांडवल आणि अणुबॉम्बचा एकाधिकार होता. युद्धानंतर सोव्हिएत युनियन ही दुसरी महाशक्ती उदयास आली. दोन्ही देशांमध्ये कम्युनिझम विरुद्ध भांडवलशाहीचा संघर्ष सुरू झाला. या संघर्षात अमेरिकेने स्वतःला ङ्गजागतिक शांतिदूतफम्हणून सादर केले. पण वस्तुस्थिती ही आहे की अमेरिका युद्धपीपासू आणि साम्राज्यवादी होती. कम्युनिझमविरुद्ध आणि स्वतःच्या आर्थिक आणि राजकीय हितसंबंधांसाठी जगभर लष्करी हस्तक्षेप करून आपला अधिकार प्रस्थापित केला. या धोरणाने कोरियन युद्ध १९५०-५३ ही अमेरिकेच्या हस्तक्षेपाची पहिली मोठी घटना. उत्तर कोरियाने दक्षिण कोरियावर आक्रमण केले तेव्हा अमेरिकेने संयुक्त राष्ट्रांच्या नावाने १६ देशांच्या सेनेचे नेतृत्व केले. चीन आणि सोव्हिएत युनियनने उत्तर कोरियाला पाठिंबा दिला. युद्धात ३५ लाखांहून अधिक लोक मारले गेले. अमेरिकेने अणुबॉम्ब वापरण्याची धमकी दिली. युद्ध तहात संपले, पण उत्तर कोरिया अद्याप कम्युनिस्ट राहिला. तरीही अमेरिकेने दक्षिण कोरियात आपला लष्करी तळ कायम ठेवला आणि आशियातील आपला प्रभाव वाढवला. १९५३ मध्ये इराणमध्ये अमेरिकेने सीआयएमार्फत ऑपरेशन अजॅक्स राबवले. लोकशाहीने निवडून आलेले पंतप्रधान मोहम्मद मोसादेक यांनी ब्रिटिश तेल कंपनीला राष्ट्रीयीकृत केले होते. अमेरिकेने आणि ब्रिटनने शहा मोहम्मद रेझा पहलवी यांना सत्तेवर आणले. मोसादेक सरकार उलथवण्यात आले. यामागे तेलाचे हितसंबंध होते. यानंतर इराण २५ वर्षे अमेरिकेच्या नियंत्रणात राहिला. पण १९७९ च्या इस्लामिक क्रांतीत शहा पळून गेला आणि अमेरिकेच्या विरोधात इस्लामी सरकार आले. ही घटना अमेरिकेच्या सरकार बदल धोरणाची सुरुवात होती. आता त्याच पेहलवींचे वंशज रझा यांनी अमेरिकेच्या इराणमधील कारवाईला पाठिंबा दिला आहे. १९५४ मध्ये ग्वाटेमालामध्येही असाच हस्तक्षेप झाला. लोकशाही पंतप्रधान जेकबो आर्बेन्झ यांनी युनायटेड फ्रूट कंपनीची जमीन शेतकऱ्यांना वाटली. अमेरिकेच्या सीआयएने ऑपरेशन पीबीए सक्सेस राबवून आर्बेन्झ सरकार उलथवले. सैन्याने सत्ता घेतली. यानंतर ग्वाटेमालामध्ये दशकभर गृहयुद्ध सुरू राहिले आणि लाखो लोक मारले गेले. अमेरिका कोणत्या देशाने कोणाकडून काय भावाने तेल खरेदी करावे हेही ठरवत आहे. याला दादागिरीची हद्द म्हणावी! आखातातील संघर्षामुळे निर्माण झालेल्या इंधनपुरवठा संकटानंतर अमेरिकेने भारताला रशियाकडून कच्चे तेल खरेदी करण्यासाठी ३० दिवसांची तात्पुरती सवलत दिली आहे.

# प्रभू श्रीरामांचा जन्मोत्सव उत्साहात

## नंदुरबारमध्ये रघुवंशी समाजातर्फे मिरवणूक; भक्तिमय वातावरण

प्रतिनिधी । नंदुरबार



**जय श्रीरामचा जयघोष, ढोल ताशांचा गजरात आणि भक्तीमय वातावरणात नंदुरबार शहरात रघुवंशी समाजाच्या वतीने रामनवमीनिमित्त भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत श्रीराम जन्मोत्सवाचा ठिकठिकाणी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे नंदुरबार शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.**

यावेळी तरुणांनी ढोल-ताशांच्या तालावर आणि डीजेवरील श्रीरामांच्या गीतांवर नृत्य करत युवक-युवतींसह महिलांनी एकच जल्लोष साजरा केला. दरम्यान, प्रभू श्रीरामांचा जन्मोत्सव जिल्हाभरात सर्वत्र धार्मिक आणि भक्मतीमय वातावरणात साजरा करण्यात आला. शहरात विविध ठिकाणी भजन, कीर्तन, महाप्रसाद वाटप, रक्तदान शिबीर आदी कार्यक्रम घेण्यात आले. दरवर्षीप्रमाणे यंदाही रघुवंशी समाजाच्या वतीने गुरुवारी सकाळी वाजता या शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. शोभायात्रेच्या प्रारंभी शिवसेनेचे संपर्कप्रमुख आ.चंद्रकांत रघुवंशी आणि नगराध्यक्षा रत्ना रघुवंशी यांच्या हस्ते प्रभू श्रीरामाच्या प्रतिमेचे पूजन करुन आरती करण्यात आली. परदेशीपुरा येथील श्रीराम मंदिरापासून या शोभायात्रेला सुरुवात झाली. तेथून आमदार कार्यालय, जुनी नगरपालिका चौक, परदेशीपुरा, अंधारे चौक या मार्गाने मार्गक्रमण करत शोभायात्रा पुन्हा श्रीराम मंदिरात विसर्जित करण्यात आली. या संपूर्ण मार्गावर रघुवंशी समाजाचे बांधव आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दुपारी १२ वाजता श्रीराम मंदिरात प्रभू श्रीरामाचा जन्मोत्सव मोठ्या थाटात साजरा करण्यात आला. जन्मोत्सवाच्या वेळी सियावर रामचंद्र की जयच्या घोषणांनी मंदिर परिसर दुमदुमून गेला होता. दर्शनासाठी भाविकांनी सकाळपासून मंदिरात मोठी गर्दी केली होती.

दरम्यान, प्रभू श्रीरामांचा जन्मोत्सव सर्वत्र धार्मिक आणि भक्मतीमय वातावरणात साजरा करण्यात आला. ठिकठिकाणी भजन, कीर्तन, महाप्रसाद वाटप, रक्तदान शिबीर आदी कार्यक्रम घेण्यात आले. या उपक्रमांमुळे जिल्ह्यायात धार्मिक वातावरण निर्माण झाले होते.

# दीड हजार वीज ग्राहकांकडे १५७.४६ कोटींची थकबाकी

प्रतिनिधी । नंदुरबार

**नंदुरबार मंडलातील १ हजार ४६८ पथदीप ग्राहकांकडे १५७ कोटी ४६ लाख रुपयांची वीज बिल थकबाकी आहे. महावितरणच्या जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यांतील ४ हजार ३४९ सार्वजनिक पाणी पुरवठा योजनांकडे तब्बल ४८१ कोटी रुपयांची तर ५ हजार ६३३ पथदीप ग्राहकांकडे ४७६ कोटी रुपयांची वीजबिल थकबाकी आहे.**

वीजबिल भरण्यास प्रतिसाद न देणाऱ्या सार्वजनिक पाणीपुरवठा योजना तसेच पथदिव्यांचा वीजपुरवठा कधीही खंडित केला जाऊ शकतो. यामुळे निर्माण होणाऱ्या कृत्रिम जलसंकटास व अंधारास संबंधित विभाग जबाबदार राहतील, असे महावितरणने स्पष्ट केले आहे. महावितरणकडून थकबाकी वसुलीसाठी संबंधित विभागांशी वारंवार संपर्क साधण्यात आला आहे. प्रत्यक्ष भेटी, पत्रव्यवहार, स्म रणपत्रे तसेच मोबाईल संदेशांच्या माध्यमातून वीज बिल भरण्याचे आवाहन करण्यात आले. मात्र, अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने आता वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई अपरिहार्य ठरत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. यासाठी क्षेत्रीय कार्यालयांना आवश्यक निर्देशही देण्यात आले आहेत. जळगाव मंडलातील २ हजार ३३९ योजनांकडे २८७ कोटी २४ लाख, धुळे मंडलातील १ हजार १६२ पाणी योजनांकडे १३५ कोटी ३५ लाख तर नंदुरबार मंडलातील ८४८ योजनांकडे ५९ कोटी २७ लाख रुपयांची थकबाकी आहे. तसेच जळगाव मंडलात २७५७ पथदीप ग्राहकांकडे १८१ कोटी ५८ लाख, धुळे मंडलात १ हजार ४०८ पथदीप ग्राहकांकडे १३७ कोटी ३ लाख तर नंदुरबार मंडलातील १ हजार ४६८ पथदीप ग्राहकांकडे १५७ कोटी ४६ लाख रुपयांची थकबाकी आहे. चालू आर्थिक वर्ष संपण्यास अवघे चार दिवस शिल्लक असल्याने महावितरणने वसुली मोहिमेला अधिक गती दिली आहे. संबंधित विभागांनी तातडीने पाणीपुरवठा व पथदिव्यांची थकबाकी भरून सहकार्य करावे, असे आवाहन मुख्य अभियंता आय.ए. मुलाणी यांनी केले आहे.

# थकीत पाणीपट्टी वसुलीसाठी विशेष मोहीम

प्रतिनिधी । धुळे

**शहरातील मालमत्ताधारकांकडील थकीत पाणीपट्टी वसुलीसाठी विशेष मोहिम, मनपा आयुक्त नितीन कापडणीस व उपायुक्त स्वालिया मालगावे यांच्या मार्गदर्शनाखाली हाती घेण्यात आली आहे. महापालिका क्षेत्रातील थकीत पाणीपट्टी वसुल करण्यासाठी मनपा प्रशासनाने आता कंबर कसली आहे.**

शहरात विशेष वसुली मोहिम होती घेण्यात आलेली आहे. वारंवार सुचना देवुनही थकबाकी न भरणाऱ्या मालमत्ताधारकांवर कठोर कारवाई करण्याचे संकेत प्रशासनाने दिले आहे. मालमत्ताधारकांपैकी काही मालमत्ता धारक मालमत्ता कर महापालिकेकडे जमा करीत असतात. परंतु पाणीपट्टी महापालिकेकडे जमा करीत नाही. यामुळे शहरातील सर्वच भागातील मालमत्ताधारकांकडे मोठ्या प्रमाणावर पाणीपट्टी थकित आहे. सदरची पाणी पट्टी वसुलीसाठी मनपा आयुक्त कापडणीस व उपायुक्त मालगावे यांच्या मार्गदर्शनाखाली चार विशेष पथकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

# श्री धनाई-पुनाई देवीचा ३१ मार्चपासून यात्रोत्सव

प्रतिनिधी । धुळे



**झिरणीपाडा निजामपूर ता. साक्री येथे कुलदेवता श्री धनाई पुनाई मातेचा यात्रोत्सव दि. ३१ मार्चपासून होत आहे. या यानिमित्त महाराष्ट्रातीलच नव्हे तर गुजरात, मध्यप्रदेश येथून भाविक दर्शनासाठी येथे येत असतात.**

निसर्गसंपन्न परिसरात मंदिर असल्याने येथील वातावरण भाविकांना नेहमीच आकर्षित करते. दि. ३१ मार्च रोजी पहाटे ४ वाजेदरम्यान मातेची महापूजा होईल. यासोबत मंदिरात दिवसभर विविध कार्यक्रम होणार आहेत. यात्रोत्सव यशस्वीतेसाठी श्री धनाई पुनाई देवी ट्रस्टचे अध्यक्ष रामचंद्र साबळे, विश्वस्त नरेंद्र चौधरी यांच्यासह सर्व विश्वस्त मंडळ तसेच व्यवस्थापक मंडळाच्या मार्गदर्शनाखाली परिसरातील ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत. भाविकांच्या सोयीसाठी पिण्याच्या पाण्याच्या ठिकठिकाणी तोटया उभारण्यात आल्या आहेत. मनोरंजनासाठी दुकाने, हॉटेल्स, पाळणे, नारळ व पेढे व्यापारी वर्ग येथे दाखल झाला आहे. विश्वस्त मंडळाच्या वतीने मंदिरात वर्षभर विविध धार्मिक कार्यक्रम होतात. मंदीर परिसरात विद्युत एलईडीदिव्यासह पोल तसेच सौर एलईडीदिव्यासह पोल उभारणी करण्यात आली आहे. तसेच मंदिरास दानशुर भाविकाच्या सहकार्यातून रंगरंगोटी व स्टील रॅलींगचे काम करण्यात आले आहे. मंदीर परिसरात जागोजागी पथदिवे लावण्यात आले असून मंदीर परिसरात भाविकांना श्री धनाई पुनाई मातेचे फोटो, स्टिकर, पुस्तके देखील उपलब्ध आहेत. कुलदेवता श्री धनाई पुनाई माता विविध जातीच्या कुळांची कुलदेवता आहे. गेल्या काही वर्षापासून भाविकांची विशेष वर्दळ वाढली असून भाविकांना विविध सोयी सुविधा पुरविण्याचा मंडळाचा प्रयत्न आहे, असे ट्रस्टचे अध्यक्ष रामचंद्र साबळे, विश्वस्त नरेंद्र चौधरी, संजय बागुल यांनी सांगितले.

## पान १ वरुन

**जम्मू-काश्मीर विधानसभेत.....**

समाजात अयातुल्ला अली खामेनी यांच्या हत्येचा निषेध केला होता. त्याचप्रमाणे, आज आम्ही सर्वजण येथे उभे आहोत.आम्ही समजतो की ज्या पद्धतीने खामेनी यांना मारण्यात आले, कोणत्याही देशाला दुसऱ्या देशावर हल्ला करण्याचा कोणताही हक्क नाही. मला वाटते की, देशाच्या सर्वोच्च नेतृत्वाने याचा निषेध केला पाहिजे. आम्ही इराणच्या लोकांना पाठिंबा देत आहोत.

**राज्यात लॉकडाऊन लागणार ......**

अफवांमुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण पसरण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर प्रतिक्रिया देत लॉकडाऊन लागणार नसल्याचं स्पष्ट केलं आहे. तसेच अशा प्रकारे लॉकडाऊन लागणार अशा अफवा पसरवल्यास थेट फौजदारी कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिला आहे.

**खरात प्रकरणात रुपाली.....**

यांनी पत्रकारांशी संवाद साधला. खरात प्रकरणात इतरांवर गुन्हा दाखल करण्याचा दबाव चाकणकरांनी आणला होता. या प्रकरणात राज्य महिला आयोगाकडे ज्या महिला आपल्या तक्रारी घेऊन जात होत्या. त्यांची भेट चाकणकर यांनी घेतली.त्यांच्या तक्रारी ऐकल्यानंतर त्या महिलांना तुमचे ग्रह, तारे बघितले का, पत्रिका पाहिली का, अशी विचारणा करुन चाकणकर त्या महिलांना खरात याच्याकडे पाठवत होत्या. खरात याला अटक झाल्यानंतर अनेक पीडितांनी प्रतिष्ठानशी संपर्क साधला. खरातच्या अत्याचाराचा पाढा वाचला. या प्रकरणात चाकणकर या दलाल म्हणून कार्यरत होत्या. प्राथमिक माहितीनुसार ही साखळी चाकणकर चालवत होत्या. या प्रकरणात चाकणकर यांना सहआरोपी करा, अशी मागणी ठोंबरे यांनी केली.पीडित महिलांच्या चित्रफिती समोर येत आहेत. पीडितेची, तिच्या कुटूंबाची ओळख उघड होत आहे. पोलिसांनी या प्रकरणात आजपर्यंत चाकणकरांची चौकशी का केली नाही. त्यांच्याकडे चाकणकर यांच्या कुटूंबाशी संबंधित चित्रफिती आहेत का, याची माहिती द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

**पेट्रोल, डिझेलवरील.....**

अँड डेव्हलपमेंट सेस, रोड अँड इन्फ्रास्ट्रक्चर सेसही आकारला जातो. विशेष अतिरिक्त उत्पादन शुल्कात घट केल्याने केंद्र सरकारला आता प्रति लीटर पेट्रोलमागे तीन रूपये विशेष अतिरिक्त उत्पादन शुल्क मिळेल, तर डिझेलमागे काही मिळणार नाही. ऑइल मार्केटिंग कंपन्यांना (ओएमसी) आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून केंद्र सरकारने घेतलेल्या या निर्णयाने केंद्र सरकारच्या महसूलात मोठी घट होणार आहे.

**उपमुख्यमंत्र्याला न्याय.....**

अजितदादांना न्याय मिळवून देण्यासाठी सहकार्य करावे, अशी विनंती रोहित पवारांनी केली आहे. संसदेत झीरो अवरमध्ये बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, माझ्या भावाला जाऊन आज दोन महीने पूर्ण झाले. २८ जानेवारी रोजी माझ्या भावाचे विमान क्रॅश झाले होते. दोन महीने झाले या गोष्टीला. एखाद्या घरातला कर्ता पुरुष जातो न त्याचे दुःख त्या कुटुंबालाच माहीत असते. आम्ही पण हे भोगले आहे. मग विमानात जाऊदे, रेल्वेमध्ये जाऊदे, सुरक्षितता ही अतिशय महत्त्वाची झाली आहे. सुरक्षितता कशासाठी? तर माझ्या भावाचे प्लेन क्रॅश झाले. दोन महीने झाले, माझ्या कुटुंबाला कुठे नये मिळाला? माझा भाऊ डेप्युटी चीफ मिनिस्टर होता महाराष्ट्राचा. त्याला जर न्याय मिळत नसेल, तर सर्वसामान्यांना न्याय कसा मिळणार? असा सवाल सुळे यांनी उपस्थित केला.

**महसूल विभागातील १३.....**

त्यानुसार शासनाने या १३ गंभीर प्रकरणांतील जबाबदार अधिकाऱ्यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्याचे आदेश दिले आहेत. या कारवाईत अनेक वरिष्ठ व कनिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असून, संबंधित विभागीय आयुक्तांना तातडीने अनुपालन अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या प्रकरणामुळे महसूल विभागाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, पुढील काळात आणखी गैरप्रकार उघड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**हॉटेल आणि औद्योगिक......**

एलपीजीच्या पुरवठ्यात मोठी घट झाली होती. आता केंद्र सरकारने राज्यांसाठीचा हा कोटा २० टक्क्यांनी वाढवला आहे. यामुळे आता कमर्शियल एलपीजीचा पुरवठा युद्धपूर्व काळातील मागणीच्या ७० टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे.

# विजेत्या पैलवानांच्या सन्मानार्थ मोटारसायकल रॅली

## धुळे जिल्ह्याचा अभिमान उंचावला ; तेजस अपळकर, गौरी लोखंडे यांचा गौरव

प्रतिनिधी । धुळे



**शहरासह संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानास्पद ठरलेल्या कुस्ती क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीमुळे दोन होतकरू खेळाडूंनी राज्य व राष्ट्रीय पातळीवर आपली दमदार छाप उमटवत जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले आहे.**

महाराष्ट्राच्या मानाच्या महाराष्ट्र केसरी स्पर्धा २०२६ मध्ये पैलवान तेजस गजेंद्र अंपळकर यांनी ८६ किलो वजनी गटात तृतीय क्रमांक पटकावत मानाचे कांस्य पदक मिळवले आहे. त्याचबरोबर हर हर महादेव विजय व्यायामशाळेची पैलवान गौरी सतीश लोखंडे हिने केवळ राज्यस्तरावरच नव्हे, तर राष्ट्रीय स्तरावरही लक्षणीय यश संपादन करत इतिहास रचला आहे. ३८ किलो वजनी गटात १५ वर्षांखालील शालेय कुस्ती स्पर्धेत राज्यस्तरीय प्रथम क्रमांक पटकावत तिने आपली गुणवत्ता सिद्ध केली. त्यानंतर तामिळनाडू येथे पार पडलेल्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत देशात तृतीय स्थान पटकावून तिने धुळे जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

या यशाच्या पार्श्वभूमीवर दोन्ही खेळाडूंच्या सन्मानार्थ शहरात बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीला शहरवासीयांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधी पुतळा परिसरातील हनुमान मंदिरात पूजा-अर्चा करून करण्यात आली. यानंतर महात्मा गांधी स्मारकास पुष्पहार अर्पण करून विजेत्या खेळाडूंना अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी पै. तेजस अंपळकर व पै. गौरी लोखंडे, पै. संजय गिरी, पै. सतिष अंपळकर, क्रीडा अधिकारी एम. के. पाटील, विजय पाटील, डॉ. सुशील महाजन, डॉ. श्रीराम रामेश्वर भतवाल आदी उपस्थित होते.

# व्यावसायिक गॅस सिलिंडर टंचाई हॉटेल व्यवसाय धोक्यात

प्रतिनिधी । तळोदा

**आखाती देशातील युद्धामुळे निर्माण झालेल्या टंचाईमुळे व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा विस्कळीत झाला असून तळोद्यातील हॉटेल आणि रेस्टॉरंट व्यवसायाला मोठा फटका बसला आहे.**

अनेक ठिकाणी गॅसअभावी नाश्ता तर काही ठिकाणी हॉटेल व्यावसायिकांनी दुपारचे जेवण देखील बंद केले असून तर काही ठिकाणी चुलीवर स्वयंपाक करण्याची वेळ हॉटेल व्यवसायिकांवर आली असून ज्यामुळे हॉटेल व्यवसाय संकटात सापडला आहे.

व्यावसायिक गॅस सिलिंडर वेळेवर न मिळाल्याने तळोदा येथील हॉटेल्सवर मोठा परिणाम झाला असून हॉटेल व्यवसायिक गॅस टंचाईमुळे अनेक हॉटेल्समध्ये चुली पेटवून स्वयंपाक केला जात आहे. यामुळे ग्राहकांना वेळेत जेवण देण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. तसेच गॅस सिलिंडर मिळत नसल्याने काही हॉटेल व्यवसायिकांनी हॉटेल बंद केल्या असून हॉटेल गॅस सिलिंडर टंचाईमुळे आमचा व्यवसाय पूर्णपणे विस्कळीत झाला आहे. चुलीवर स्वयंपाक करत असल्याने ग्राहकांनाही सेवा उशिरा मिळते.

**चोपडा नगरपरिषद, चोपडा जिल्हा जळगांव**

**CHOPDA MUNICPAL COUNCIL, CHOPDA, DIST. JALGAON - 425107**
Ph. (02586) 220016 Toll Free No.: 1800 233 5251 Fax: 220702
e-mail: co.mcchopda@gmail.com

जा.क्र.२०२५-२०२६/भांडार/कार्या. क्र २९ | दि. २७/०३/२०२६

**जाहीर ई-निविदा सूचना**

चोपडा नगरपरिषदेस भांडार विभागासाठी सन २०२६-२०२७ या वित्तीय वर्षाकरीता कार्यालयीन नमुने स्टेशनरी साहित्य पुरविणे साठी इकडील जा.क्र. २०२५-२०२६ /भांडार/कार्या.क्र.२५ दि. १७/०३/२०२६ अन्वये जाहीर ई निविदा सूचना दिनांक १८/०३/२०२६ रोजी दैनिक शौर्य मराठी मध्ये प्रसिध्द करण्यात आली होती. विहित कालावधीत पुरेश्या प्रमाणात निविदा प्राप्त न झाल्यामुळे स्पर्धात्मक दर प्राप्त होणेसाठी प्रथम मुदतवाढ देण्यात येत आहे.

तरी इच्छुकांनी आपले दर ऑनलाईन पध्दतीने दि.३०/०३/२०२६ पर्यंत दाखल करावे. सदर कामांचा सविस्तर तपशिल https:mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा सूचनामध्ये अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

सही/-
X-X-X
मुख्याधिकारी
चोपडा नगरपरिषद, चोपडा

चोपडा नगरपरिषद, चोपडा जिल्हा जळगांव

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.- ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**✲ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी** (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# उचित भरपाई अन् पारदर्शकतेवर भर द्या

## जळगावात भूसंपादन मूल्यांकन समितीची बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचना

प्रतिनिधी । जळगाव

**भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत प्रक्रियेत उचित भरपाई व पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय मूल्यांकन समितीची बैठक आज पार पडली. यात उचित भरपाई आणि पारदर्शकतेवर भर द्या, अशा सूचना भूसंपादन मूल्यांकन समितीची बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.**



संबंधित अधिनियम २०१३ मधील तरतुदींनुसार ही बैठक आयोजित करण्यात आली होती.बैठकीत संपादित करण्यात येणाऱ्या खाजगी जमिनीवरील मालमत्ता, पिके, वनझाडे, फळझाडे, विहिरी तसेच इतर जलसंपत्ती यांचे अचूक व वास्तव मूल्यांकन करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. विविध तांत्रिक विभागांकडून आवश्यक अभिप्राय घेऊन मूल्यांकन प्रक्रिया नियमबद्ध व पारदर्शक पद्धतीने राबवण्याचे निर्देश जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले. तसेच, विकास प्रकल्पांसाठी आवश्यक जमीन ताब्यात घेताना संबंधित भूधारकांना वेळेत व योग्य मोबदला मिळावा, यासाठी पुढील कार्यवाही गतीमान करण्याच्या सूचना प्रशासनाकडून देण्यात आल्या. भूसंपादन अधिनियमातील तरतुदींचे काटेकोर पालन करत प्रकल्पग्रस्तांचे हित जपणे आणि विकासकामांना वेग देणे, हे बैठकीचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

जिल्ह्यातील शेतकरी व भूधारकांच्या हक्कांचे संरक्षण करत त्यांना न्याय्य भरपाई मिळवून देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे देखील अधोरेखित करण्यात आले.

# मोटारसायकल चोरीतील दोन आरोपींना अटक

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील नविन बसस्टॅन्ड परिसरातून चोरीला गेलेल्या मोटारसायकल प्रकरणाचा जिल्हापेठ पोलिसांनी यशस्वी तपास लावत दोन आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत चोरीस गेलेली होंडा कंपनीची ड्रीम मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे.**

दि.२० जानेवारी रोजी जिल्हापेठ पोलीस स्टेशन येथे ११/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेनंतर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत गोपनीय माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपींचा माग काढला. तपासादरम्यान पोलिसांनी पथक तयार करून आरोपी आकाश राजू खरे (रा. नांद्रा, ता. पाचोरा, जि. जळगाव, सध्या रा. पिंप्राळा हुडको, जळगाव) व आरोपी आकाश प्रकाश भिल (रा. कासमपुरा, ता. पाचोरा, जि. जळगाव) यांना अटक केली. न्यायालयाकडून एक दिवसांची पोलीस कोठडी मिळाल्यानंतर आरोपींची कसून चौकशी करण्यात आली. चौकशीत आरोपींनी जळगाव शहरातील भज्जी गल्ली परिसरातून मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली. त्यांच्या कबुलीजबाबावरून चोरीस गेलेली मोटारसायकल हस्तगत करण्यात आली असून ती जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार महेंद्र पाटील करत आहेत. पोलीस उपनिरीक्षक शांताराम देशमुख, पोलीस हवालदार महेश महाजन, महेंद्र पाटील, मिलिंद सोनवणे, तुषार पाटील, विशाल साळुंके, गोविंद साबळे आणि जयेश मोरे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

## थोडक्यात

### करंज येथील तलाठ्यावर गुन्हा दाखल

**जळगाव ।** शेतजमिनीची खरेदी नोंद लावण्यासाठी ५,००० रुपयांच्या लाचेची मागणी केल्याप्रकरणी जळगाव तालुक्यातील सजा करंज येथील तलाठ्याविरुद्ध जळगाव तालुका पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अजय बिडवे असे गुन्हा दाखल झालेल्या लोकसेवकाचे नाव आहे. या प्रकरणातील तक्रारदाराने आपल्या पत्नीच्या नावे संबंधित तलाठ्याच्या कार्यक्षेत्रात शेतजमीन खरेदी केली होती. या खरेदी केलेल्या क्षेत्रावर सरकारी दप्तरी नोंद करण्यासाठी तलाठी अजय बिडवे यांनी ५,००० रुपयांच्या लाचेची मागणी केली होती.

### जिजाऊ ब्रिगेडचे ३ एप्रिल रोजी मुंबई येथे राज्य महाअधिवेशन

**जळगाव ।** महिलांचे सामाजिक सांस्कृतिक व वैचारिक विचारपीठ असलेल्या जिजाऊ ब्रिगेड च्या वतीने दिनांक ३ एप्रिल २०२६ रोजी राज्यस्तरीय महाअधिवेशन श्री छत्रपती शिवाजी महाराज नाट्यमंदिर मुंबई (दादर) येथे आयोजित करण्यात आलेले आहे. या अधिवेशनासाठी महाराष्ट्रासह देशभरातून जवळपास एक हजार महिला पदाधिकारी सहभागी होणार आहेत तसेच प्रत्येक जिल्ह्यातील असंख्य कार्यकर्ते उपस्थित राहणार असून या अधिवेशनातील वैचारिक प्रबोधनाचा व सांस्कृतिक उपक्रमांचा लाभ घेण्यासाठी महाराष्ट्रातील,जिल्ह्यातील तसेच शहरातील महिलांनी उपस्थित राहण्याचे आव्हान जिजाऊ ब्रिगेडच्या-जिल्हा अध्यक्ष शिवमती लीना राम पवार यांनी केले आहे.

### पोलीस दलाच्या श्वान पथकात धुरंदरची भर

**जळगाव ।** जळगाव जिल्हा पोलीस दलाच्या श्वान पथकात नव्या श्वानाची भर पडली असून या श्वानाचे नाव धुरंदर असे ठेवण्यात आले आहे. गुन्हे शोध, तपास तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी धुरंदर महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याची माहिती पोलीस प्रशासनाकडून देण्यात आली. पोलीस तपास प्रक्रियेत श्वान पथकाचे विशेष महत्त्व असते. घटनास्थळावरील पुरावे शोधणे, संशयितांचा माग काढणे आणि गुन्हे उकलण्यात श्वानांची मदत प्रभावी ठरते. या पार्श्वभूमीवर धुरंदरचा समावेश पोलीस दलासाठी एक मोठी ताकद मानला जात आहे. प्रशिक्षित धुरंदरच्या माध्यमातून गुन्हे उकलण्याचा वेग वाढण्यास मदत होणार असून, कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षमपणे राखण्यास पोलीस दलाला बळ मिळणार आहे.

# महापौर दीपमाला काळेंचे ५० किमी सायकलिंग

## जळगाव सायकलिंग ग्रुपतर्फे रामनवमीनिमित्त सायकल रॅली

प्रतिनिधी । जळगाव

**श्री रामनवमीचे औचित्य साधून जळगाव सायकलिंग ग्रुपतर्फे शहरात भव्य सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील चिमुकले राम मंदिर ते खेडी-आव्हाणे गाव अशा या रॅलीमध्ये जळगावच्या महापौर दीपमाला काळे यांनी स्वत: ५० किलोमीटर सायकल चालवून रॅली पूर्ण केली आणि सायकलिस्टचा उत्साह द्विगुणित केला.**



या रॅलीत जळगाव सायकलिंग ग्रुपचे सुमारे ३० सभासद सहभागी झाले होते. यामध्ये धर्मादाय आयुक्त मोहन गाढे यांच्यासह अनेक मान्यवर सायकलिस्ट यांनी सहभाग नोंदवला. रामनवमीच्या पवित्र मुहूर्तावर निरामय आरोग्याचा संदेश देण्यासाठी ही रॅली काढण्यात आली होती. सायकल रॅली खेडी, आव्हाणे गावात पोहोचल्यानंतर तेथील ग्रामस्थांनी महापौरांचे आणि सायकलिस्टचे जोरदार स्वागत केले. यावेळी खेडी, आव्हाणे गावाचे सरपंच कैलास चौधरी, आदर्श शेतकरी बाळू चौधरी, पोलीस पाटील, शरद सपकाळे यांच्यासह ग्रामपंचायतीचे सदस्य, गावातील प्रतिष्ठित नागरिक आणि राम मंदिर ट्रस्टचे पदाधिकारी उपस्थित होते. महापौर दीपमाला काळे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला. भक्ती आणि व्यायामाचा संगम एकीकडे रामजन्मोत्सवाचा उत्साह आणि दुसरीकडे सायकलिंगच्या माध्यमातून तंदुरुस्तीचा संदेश, अशा या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पूर्ववैमनस्यातून तरुणावर प्राणघातक हल्ला

प्रतिनिधी । जळगाव

शहरातील हॉटेल आदित्याजवळील रिक्षा स्टॉपवर पूर्ववैमनस्यातून एका तरुणावर चॉपरसारख्या धारदार शस्त्राने वार करून त्याला जखमी केल्याची खळबळजनक घटना घडली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी हर्षल विनोद वाणी (वय २०, रा. रामेश्वर कॉलनी, जळगाव) हे २५ मार्च रोजी रात्री ११ वाजेच्या सुमारास हॉटेल आदित्या समोरील बंगला चौकातील रिक्षा स्टॉपजवळ उभे होते. यावेळी संशयित आरोपी हर्षल विनोद वाणी (मजुरी काम करणारा) आणि कृष्णा सोनवणे (पबजी) हे दोघे दारूच्या नशेत त्या ठिकाणी आले.माझ्या भावाला मागच्या वेळी का मारहाण केली होती? असा जाब विचारत आरोपींनी फिर्यादी हर्षल आणि त्याच्या मित्रांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले असता, आरोपीने आपल्या खिशातील चॉपरसारखे धारदार शस्त्र काढून हर्षलच्या पाठीवर वार केले. या हल्ल्यात हर्षल गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

# श्रीरामनवमीनिमित्त शेंदुर्णीत विश्व हिंदू परिषद-बजरंग दलाचे शौर्य संचलन



प्रतिनिधी । शेंदुर्णी

**प्रभू श्रीरामचंद्रांच्या जन्मोत्सवानिमित्त शेंदुर्णी नगरीत प्रथमच विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्यावतीने भव्य शौर्य संचलनाचे आयोजन करण्यात आले. या संचलनाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शौर्य संचलनात सुमारे २०० गणवेशधारक तसेच मंगल वेशातील १५५ पेक्षा अधिक बजरंगी सहभागी झाले होते.**

श्रीराम जय राम जय जय राम, भारत माता की जय, वंदे मातरम् अशा घोषणांनी आणि देशभक्तीपर गीतांच्या तालावर संपूर्ण शेंदुर्णी नगरी देशभक्तीच्या वातावरणात दुमदुमून गेली. संचलनानंतर नगरपंचायत मैदानावर प्रकट कार्यक्रम पार पडला. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून सिद्धेश्वरजी बिराजदार उपस्थित होते. तसेच भिका इंदरकर आणि वरुण इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भिका इंदरकर यांनी करताना सांगितले की, या संचलनाचा उद्देश सकल हिंदू समाजाला एकत्रित करणे, देव-देश-धर्माचे रक्षण करणे आणि सेवा, सुरक्षा, संस्कार या त्रिसूत्रीवर समाजाला चालना देणे हा आहे. प्रमुख वक्त्यांनी बजरंग दलाच्या स्थापनेपासून राम मंदिर आंदोलनापर्यंतचा प्रवास उपस्थितांसमोर मांडला. तसेच आजच्या तरुण पिढीला व्यसनांपासून दूर ठेवणे, समाजातील विविध सामाजिक आव्हानांविषयी जागरूकता निर्माण करणे आणि पंचपरिवर्तन सारख्या उपक्रमांची गरज अधोरेखित केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मयूर माळी यांनी केले. सांघिक गीत भूषण दामधर यांनी सादर केले, सुभाषित विक्रम माळी यांनी मांडले, तर आभार प्रदर्शन अर्जुन वाघ यांनी केले.

समारोप घनश्याम माळी यांनी समरसता मंत्राने केला. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# शेंदुर्णीत महिलांसाठी जीम उभारण्याचा मार्ग मोकळा

## नगरसेविका अश्विनी गरुड यांच्या मागणीला यश

प्रतिनिधी । शेंदुर्णी

**शेंदुर्णी येथे महिलांसाठी स्वतंत्र जीम उभारण्याचा मार्ग अखेर मोकळा झाला असून, नगरसेविका अश्विनी गरुड यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले आहे. गेल्या अनेक दिवसांपासून परिसरातील महिला वर्गाकडून स्वतंत्र जीमची मागणी होत होती.**

या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १२ च्या नगरसेविका अश्विनी गरुड यांनी जिल्हा परिषद मुलींच्या शाळेजवळील उपलब्ध खुल्या जागेत महिलांसाठी जीम उभारण्याचा प्रस्ताव नगरपंचायत बैठकीत मांडला. या प्रस्तावाला सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. नगरपंचायतीकडून या प्रकल्पाचा समावेश भविष्यातील नियोजनात करण्यात आला असून, आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासकीय पातळीवर कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा ठरणार असून नियमित व्यायामामुळे विविध शारीरिक समस्यांपासून दूर राहण्यास मदत होणार आहे. त्यामुळे महिलांकडून या जीमची मागणी सातत्याने होत होती. याबाबत नगरसेविका अश्विनी गरुड म्हणाल्या की, एक महिला म्हणून महिलांसाठी काहीतरी करण्याची माझी इच्छा होती. ही मागणी मांडण्याची संधी मिळाली आणि नगरपंचायतीतील सर्व पदाधिकाऱ्यांनी ती मान्य केल्याने समाधान वाटते. पुढेही महिला सक्षमीकरणासाठी सातत्याने प्रयत्न करत राहणार आहे. या निर्णयाला नगराध्यक्ष गोविंद अग्रवाल, मुख्याधिकारी विवेक धांडे व सर्व नगरसेवक व नगरसेविकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

# नगरदेवळा येथे श्रीराम जन्मोत्सव साजरा; संगीतमय भजन संध्येला प्रतिसाद

प्रतिनिधी । पाचोरा

**अयोध्यापती रघुकुलतिलक प्रभू श्रीरामचंद्र यांच्या जन्मोत्सव (रामनवमी) पूर्वसंध्येला नगरदेवळा येथील राम मंदिर चौकात आयोजित भव्य संगीतमय भजन संध्या भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडली.**

या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून श्रीराम जय राम जय जय राम, या गजरात सहभागी होत आध्यात्मिक आनंद अनुभवला. या भजन संध्येत रामराज्य भजनी मंडळ तसेच शिवराणा भजनी मंडळ यांनी सुमधुर भजन-कीर्तन सादर करत संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारून टाकला. श्रीरामांच्या विविध भक्तिगीतांनी उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले होते. पारंपरिक कीर्तन शैलीतून सादर करण्यात आलेल्या रचनांनी जुन्या भक्तिपरंपरेचा सुगंध दरवळत ठेवत नव्या पिढीलाही त्या भावविश्वाशी जोडण्याचे काम केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रभू श्रीरामांच्या आरतीने मंगलमय समारोप करण्यात आला. सर्व भाविकांनी एकत्र येत आरतीत सहभाग घेत भक्तीभावाने प्रभूंचे स्मरण केले.



या कार्यक्रमाचे आयोजन श्रीमती अभिलाषा भिला रोकडे यांच्या शिवकन्या बहुउद्देशीय संस्था व महात्मा ज्योतिबा फुले मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

या उपक्रमामुळे गावात धार्मिक व सांस्कृतिक वातावरण अधिक दृढ झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# मोहफुलांपासून पौष्टिक पदार्थ निर्मितीमुळे महिला सबलीकरणाला संधी

## रोटरी जळगाव-गांधी रिसर्च फाऊंडेशनच्या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी सहायक प्रकल्पाधिकारी सतीश पाटील यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । जळगाव

**रोटरी क्लब जळगाव व गांधी रिसर्च फाऊंडेशनच्या मोहफुलांपासून पौष्टिक पदार्थ बनविण्याच्या कार्यशाळेमुळे महिला सबलीकरणासोबतच उपजीविकेच्या अनेक संधी उपलब्ध होतील अशी अपेक्षा आदिवासी विकास विभाग यावलचे सहायक प्रकल्पाधिकारी सतीश पाटील यांनी व्यक्त केली.**

या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर सरपंच दत्तर सिंग पावरा, वनरक्षक विजय शिरसाठ, प्रशिक्षक डॉ. सतिश गोगुलवार, अध्यक्ष गिरीश कुळकर्णी, मानद सचिव सुभाष अमळनेरकर, संवाद सचिव पंकज व्यवहारे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधीजींच्या प्रतिमेस मान्यवराचे हस्ते सुती अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

प्रशांत सुर्यवंशी यांनी जीवन में कुछ करना है तो हिम्मत हारे मत बैठो... हे गीत सादर केले. सरपंच दत्तर सिंग पावरा म्हणाले की, मोहफुलांचा उपयोग केवळ दारु बनविण्यासाठी माहिती होता. मात्र रोटरी व गांधीतीर्थमुळे या नवीन पदार्थांची माहिती झाल्याचे त्यांनी सांगितले. वनरक्षक विजय शिरसाठ यांनी वनसंपदा आपल्यासाठी असून तिचा सुयोग्य कारणासाठी व्हावा. वनसंपदेच्या संवर्धन व मुल्यसंवर्धन याकडेही लक्ष देण्याची आवश्यकता सांगितली.



डॉ. गोगुलवार यांनी आपण कार्यशाळेतून मिळालेले शिक्षण व्यवहारात उपयोगी आणावे, असे आवाहन त्यांनी केले. महिलांनी निर्माण केलेल्या पदार्थांना चांगली बाजारपेठ उपलब्ध करून दिली पाहिजे असेही आवाहन आयोजकांनी केले. आज कार्यशाळेत मोहफुलांचा चिवडा, मोहफुलांचे लाडू व केक बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. या कार्यशाळेस ३८ आदिवासी भगिनींनी सहभाग घेतला आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत सुर्यवंशी यांनी केले. तर आभार सचिव सुभाष अमळनेरकर यांनी मानले. या कार्यक्रमास चंद्रकांत चौधरी, अर्जुन प्रसाद, रौनक, सतिश चौरसिया, पायल, अश्विनी, राखी, अभिषेक, वैभव, रजत, जयश्री, आशिक, आयुष, राहुल, युवराज कोळी, बाळू बारेला आदी उपस्थित होते. यशस्वीतेसाठी रोटरी क्लब जळगाव व गांधी रिसर्च फाऊंडेशनच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# कविता गायन, वक्तृत्व स्पर्धांचे बक्षीस वितरण

## न्हावी येथील जे. टी. महाजन इंग्लिश स्कूलमध्ये कार्यक्रम



प्रतिनिधी । चोपडा

**येथील जे.टी. महाजन सेमी इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आयोजित करण्यात आलेल्या कविता गायन व वक्तृत्व स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला.**

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, तसेच आत्मविश्वास, वक्तृत्व कौशल्य व अभिव्यक्ती क्षमता विकसित व्हावी, या उद्देशाने या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. कविता गायन स्पर्धेद्वारे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव मिळाला, तर वक्तृत्व स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना आपल्या विचारांची मांडणी प्रभावीपणे करण्याची संधी मिळाली. या दोन्ही स्पर्धांमध्ये विविध इयत्तांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपली कला सादर केली. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला शिक्षक व उपस्थितांकडून भरभरून दाद मिळाली. कविता गायन स्पर्धेत प्रथम क्रमांक सेजल संजय इंगळे (इ. ८ वी), द्वितीय चुर्णिका घनश्याम भारंबे (इ. ८ वी) व तृतीय पंकज तायडे (इ. ७ वी) यांनी पटकावला.

तसेच वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक (इ. ८ वी), द्वितीय प्रणाली चुर्णिका घनश्याम भारंबे व वरद योगेश लोंढे (इ. ९ वी), तर तृतीय मोनाली जितेंद्र चौधरी (इ. ७ वी) यांनी मिळवला. कार्यक्रमावेळी शाळेचे प्राचार्य नंदकिशोर सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अपयश ही यशाची पहिली पायरी असल्याचे सांगितले.बक्षीस न मिळालेल्या विद्यार्थ्यांनी निराश न होता अधिक मेहनत घेऊन पुढील संधी साधावी, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपशिक्षिका प्रियंका चौधरी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# डॉ.सुरेश पाटील महाविद्यालयात सीए उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार

प्रतिनिधी । चोपडा

**येथे महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील. महाविद्यालयातील पदव्युत्तर वाणिज्य विभाग व संशोधन केंद्रातर्फे आज दि. २७ मार्च २०२६ रोजी सीए परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.**



या सत्कार समारंभाप्रसंगी महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड.संदीप सुरेश पाटील तसेच महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा.डॉ. के एन. सोनवणे, समन्वयक डॉ. एस. ए.वाघ, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. सी. आर देवरे, कनिष्ठ महाविद्यालयाचे परीक्षक व्ही. एन. बोरसे, तसेच वाणिज्य विभागातील सहा. प्रा. प्रवीण इंदरचंद जैन, कनिष्ठ विभागातील सहाय्यक शिक्षक डी.डी.करणकाळ इत्यादी उपस्थित होते. या सदर कार्यक्रमाप्रसंगी सीए फायनल परीक्षेत उत्तीर्ण चेतन सुनील जैन व रोहन दीपक जैन यांचा सत्कार करण्यात आला. तसेच दीप सुहास शहा व चहक सुहास अग्रवाल हे दोन विद्यार्थी सीए आयपीसीसी परीक्षा उत्तीर्ण झाले. तसेच भाग्यश्री प्रल्हाद कुमावत या विद्यार्थिनीने सीए फाउंडेशन परीक्षा उत्तीर्ण झाली त्याबद्दल या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या सत्कार कार्यक्रमाप्रसंगी पालकांपैकी दीपक धरमचंद राखेचा यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हटले की, महाविद्यालय नेहमीच विद्यार्थ्यांना विविध उपक्रमांमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहित करत राहते व विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे तसेच विद्यार्थ्यांच्या विविध यशाचे कौतुक महाविद्यालयातर्फे नेहमीच होते.

यावेळी महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांचा सर्वंकष विकास होण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात व प्रयत्न केले जातात, त्याबद्दल त्यांनी संस्थेचे व महाविद्यालयाचे आभार मानले.

### ●स्मार्ट वर्क करा :अ‍ॅड संदीप पाटील

**या कार्यक्रमाप्रसंगी महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड.संदीप सुरेश पाटील यांनी मनोगत व्यक्त करताना सर्व विद्यार्थी व पालकांचे अभिनंदन केले. महाविद्यालयाचे भविष्यातील विविध नाविन्यपूर्ण उपक्रम याबद्दल आपले मनोगत व्यक्त करताना त्यांनी विद्यार्थ्यांनी नवीन टेक्नॉलॉजीचा अंगीकार करावा व स्मार्ट वर्कवर लक्ष केंद्रित करावे व त्यानुसार आपले करिअर निवडावे. या संदर्भात मार्गदर्शन करताना त्यांनी वाणिज्य विभागाचे विशेष कौतुक केले.**

## थोडक्यात

### सावदा दूध संस्थेत सर्रास दारू विक्री

**सावदा ।** शहरातील सहकारी दुध उत्पादक संस्थेमध्ये विदेशी दारूची बेकायदेशीर विक्री होत असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर सावदा पोलिसांनी पंचासह दि.२५ मार्च रोजी छापा टाकून कारवाई केली. या कारवाईत १३ हजार ५०० रुपयांच्या ७५० एमएलच्या ९ सिलबंद विदेशी दारूच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या. सपोनि विशाल पाटील यांना गोपनीय माहिती मिळाली होती की, सावदा शहरातील सहकारी दूध उत्पादक संस्थेच्या मागील खोलीत विदेशी दारू विक्रीसाठी साठवून ठेवण्यात आली आहे. पंचासमक्ष पोलिसांनी छापा टाकला.

# देवळी धरणात बुडून १३ वर्षीय विद्यार्थ्याचा मृत्यू

प्रतिनिधी यावल

**पहूर येथील देवळी धरणात बुडून तेरा वर्षीय विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना बुधवारी दुपारी ३ वाजेच्या सुमारास घडली असून संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.**



पहूर पेठ येथील मन्सुरी मोहल्ल्यातील रहिवासी खलील पिंजारी यांचा मुलगा आदिल खलील पिंजारी(वय३) हा आपल्या मित्रांसह अल्बकश पिंजारी व आवेश पिंजारी यांच्यासोबत देवळी धरण परिसरात गेला होता. पोहण्यासाठी त्याने पाण्यात उडी घेतली; मात्र धरणातील गाळात पाय अडकल्याने त्याला बाहेर येता आले नाही. आदिल बराच वेळ पाण्याबाहेर न आल्याने सोबतच्या लहान मुलांनी आरडाओरडा केली. परंतु त्या वेळी परिसरात कोणीही नसल्याने मदत मिळू शकली नाही. काहीवेळाने शेतातील कामगारांना आक्रोश ऐकू आल्यावर त्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. शोध घेतल्यानंतर धरणाच्या तळाशी आदिलचा मृतदेह सापडल्याने तत्काळ त्याला ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र वैद्यकीय अधिकारी डॉ.संदीप पाटील यांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले.

### बौद्ध समाज वधू-वर मेळाव्यासाठी नाव नोंदणी

प्रतिनिधी । जळगाव

जाणीव परिवार जळगाव व बौद्ध समाज वधू-वर सुचक केंद्र जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आगामी वधू-वर परिचय मेळावासाठी नाव नोंदणी सुरू करण्यात येत आहे.
सन २०१० पासून सरू झालेल्या आमच्या या सामाजिक उपक्रमाला समाज बांधवाच्या उस्फूर्त सहभागामुळेच आजतागात १४ मेळावे यशस्वीपणे पार पडले आहेत. या मेळाव्यांच्या माध्यमातून शेकडो विवाह जुळून आलेले आहे. आता सालाबादाप्रमाणे १५ वा बौद्ध धम्मीय उपवर वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यासाठी उपवर वधू-वराची नाव नोंदणी सुरू आहे.

# चोपडा येथे रामनवमीनिमित्त भव्य शोभायात्रा

## रामभक्तांना भारतीय जैन संघटनेतर्फे चिवडा वाटप

प्रतिनिधी । चोपडा

**हिंदू समाजातर्फे रामनवमीनिमित्त जबरी राम मंदिर येथून भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले.लेझीम पथक लहान विद्यार्थ्यांचे पथक मल्लखांब व ट्रॅक्टर वर विराजमान रामायणाचे पात्र साकारलेले लहान बालक मिरवणुकीचे वैशिष्ट्य होते यावेळी भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती मिरवणुकीचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले.**




भारतीय जैन संघटनेतर्फे नाश्ता म्हणून मुरमुऱ्याच्या चिवडा वितरित करण्यात आला याप्रसंगी नगरसेवक गटनेता गजेंद्र जयस्वाल, माजी नगरसेवक जीवन चौधरी, जैन समाजाचे अध्यक्ष विनोद टाटिया, माजी नगरसेवक अनिल वानखेडे, श्याम परदेशी, व्यापारी संघटनेचे कार्याध्यक्ष दीपक राखेचा, भारतीय जैन संघटनेचे जिल्हा अध्यक्ष निर्मल बोरा व जिल्हा सचिव दर्शन देशलहरा, तालुका सचिव मयंक बरडीया उपस्थित होते यशस्वीतेसाठी शुभम राखेचा, संस्कार छाजेड, प्रेम चोपडा, मनन चोपडा ,आदेश बरडीया, अभय ब्रम्हेचा, व इतर सदस्यांनी मेहनत घेतली.

### वडिलांची अपूर्ण इच्छा मुलाने पूर्ण केली पूर्ण


**अमळनेर ।** तालुक्यातील गंगापुरी येथील भीमराव किसन रामोसे यांच्या दोन्ही किडन्या फेल झाल्यामुळे ते अंथरुणाला खिळुन होते. अखेरच्या क्षणी त्यांनी आपला मुलगा महेंद्र रामोसे यांच्याजवळ सप्तशृंगी गडावर जाऊन देवीचे दर्शन घेण्याची इच्छा व्यक्त केली. शाळेच्या कामामुळे सुट्टीच्या दिवशी वडिलांना घेऊन जाऊ, असे ठरले पण तत्पूर्वीच वडिलांनी प्राण सोडले. वडिलांची अखेरची इच्छा पूर्ण महेंद्र रामोसे यांनी गावातल्या ४५ महिलांना स्वखर्चाने गडावर नेऊन देवीचे दर्शन घडवून वडिलांची इच्छा पूर्ण केली .

# बसचे चाक निखळले; २५ प्रवाशी बचावले

प्रतिनिधी । अडावद

**बऱ्हाणपूर-अंकलेश्वर हायवेवर अडावद गावानजीक काबरा पेट्रोल पंपाजवळ महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाची बस लाल परीचे मागील चाकाचे खिळे निघून व्हील चक्का बाहेर निघून स्कूटीवर जाऊन आदळल्याने स्कूटी चालक जखमी झाल्याची घटना घडली.**

चालकाच्या प्रसंगावधानाने २५ प्रवासी बालंबाल बचावल्याची घटना घडली. याबाबत प्राप्त वृत असे की, एमएच २० बीएल २१७८ ही बस चालक जी. बी पाटील वाहक के. बी पाटील यांच्या निघराणीतून रावेर वरून सुरत जाण्यासाठी निघाली होती बऱ्हाणपूर अंकलेश्वर हायवेला अडावद गावाजवळ काबरा पेट्रोल पम्पा नजीक ड्रायव्हर साईटचे मागच्या चाकाचे ८ ही नट तुटून चालत्या गाडीच्या मागच्या चाकाचे व्हील मधून निघुन समोरुन येत असलेल्या स्कुटीवर आदळले त्यात स्कुटी चालक



श्री गुलाब मुरलीधर पाटील हे जखमी झाले.बस मधील २५ प्रवाशी थोडक्यत बचावले. तरी राज्य परिवहन मंडळाचे बसेसच्या देखभाली कडे दुर्लक्ष होतं चाललेअसून प्रवाशी असुरक्षितेची भावना व्यक्त करीत आहेत.

# गोरगावले वि.का.सोसायटीची यंदाही १०० टक्के कर्जफेड

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील गोरगावले येथील विविध कार्यकारी सोसायटीने यंदाही शंभर टक्के कर्ज फेड वसुलीत यशस्वी परंपरा राखत सोसायटीच्या कार्यात मानाचा तुरा रोवला आहे.**



गतवर्षाप्रमाणे यावर्षी गोरगावले येथील विकास सोसायटीने बिकट अशा परिस्थिती असतांना बँक कर्ज फेड करण्यात कोणताही चालढकल पणा न करता शंभर टक्के यशस्वी खर्च फेड केली आहे. विशेष म्हणजे यावर्षी शासनामार्फत कर्जमाफी होणार असल्याचे चिन्ह असल्यावर देखील आपण घेतलेले कर्ज फेडावे लागेल या उद्देशाने कर्ज फेडण्याच्या पायंडा यावर्षी कायम ठेवला आहे. त्यामुळे जळगाव जिल्हा बँकेच्या चोपडा शाखेमार्फत चेअरमन प्रवीण पाटील व सचिव चंपालाल पाटील ,व्हाय चेअरमन यांचा शाल श्रीफळ व गुलदस्ता देऊन बँकेत सत्कार करण्यात आलेला आहे. संचालक घनश्याम अग्रवाल व रोहित निकम यांनी अभिनंदन केले आहे यावेळी अधिकारी कर्मचारी वर्ग व सोसायटीचे संचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत वैजापूर येथे ‘नवचेतना’ बालमेळावा उत्साहात

## वैजापूर बीटमधील सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीसांचा मेळाव्यास लाभला सहभाग

प्रतिनिधी । चोपडा

**एकात्मिक बाल विकास सेवा योजना चोपडा-२ अंतर्गत वैजापूर येथे गांधी रिसर्च फाउंडेशन, जळगाव, प्रथम एज्युकेशन फाउंडेशन आणि विभाग, चोपडा-२ यांच्या संयुक्त विद्यमाने नवचेतना बालमेळाव्याचे आयोजन जि. प. प्राथमिक शाळा वैजापूर येथे करण्यात आले होते.**



वैजापूर बीट अंतर्गत मेळावा अंगणवाडी सेविकांच्या सहभागातून झाला. या उपक्रमासाठी प्रथम फाउंडेशनच्या जिल्हा समन्वयक सुनंदा गावित यांच्या मार्गदर्शनाखाली सुपरवायझर जयमाला शिरसाठ यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच वैजापूर बीटमधील सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीस, ग्रामपंचायत वैजापूर आणि जिल्हा परिषद शाळा वैजापूर यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. यावेळी मुलांच्या सर्वांगीण विकासावर आधारित १० स्टॉल्स उभारण्यात आले होते. कार्यक्रमास वैजापूर गट ग्रामपंचायतीचे सरपंच दत्तासिंग पावरा, उपसरपंच विद्या पावरा, सुनंदा गावित, र जयमाला शिरसाठ , मुख्याध्यापक राजेंद्र चौधरी , गांधी रिसर्च फाउंडेशनचे फिल्ड ऑफिसर चंद्रकांत,पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.दातीर यांनी सहभाग नोंदवला.

# यावल येथील पेठेच्या मंदिरात श्रीराम जन्मोत्सव उत्साहात

प्रतिनिधी । यावल

**शहरातील सातोद रोडवर असलेल्या पेठेच्या श्रीराम मंदिरात गुरुवार दि.२६ मार्च रोजी श्रीराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.**



गावातील काळभैरव भजनी मंडळ व भोला भजनी मंडळ यांनी अनेक भजनी मंडळांनी प्रभू श्रीराम यांच्यावर आधारित असलेल्या भजनांनी भक्तांना मंत्रमुग्ध केले. रात्री ठीक १२ वाजता रामाचा जन्मोत्सव हा मंदिरात साजरा करण्यात आला. यावेळी डीवायएसपी बडगुजर, (फैजपूर) तसेच यावल पीएसआय धारबळे श्रीराम मंदिराचे सर्व पंच व अध्यक्ष यावेळी उपस्थित होते.

मंदिराचे पुजारी पप्पू महाराज जोशी यांच्या हस्ते रामाचा जन्मोत्सव साजरा करण्यात आला. भक्तांना पंजरीचा प्रसाद म्हणून वाटण्यात आला.

# गलंगीतून गडावर जाणाऱ्या भाविकांना टी-शर्ट वाटप



प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील गलंगी येथून आई सप्तशृंगी मातेच्या दर्शनासाठी गडावर पायी जाणाऱ्या भाविकांसाठी गावातील दातृत्वशाली महिलांकडून टी-शर्ट व उन्हापासून बचावासाठी आवश्यक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे उष्णतेत प्रवास करणाऱ्या भाविकांना मोठा दिलासा मिळाला आहे.**

दरवर्षीप्रमाणे यंदाही रामनवमी उत्सवानिमित्त गडावर जाणाऱ्या भाविकांची संख्या लक्षणीय आहे. कडक उन्हात पायी चालत जाणाऱ्या भाविकांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने माजी सरपंच सुशिलाबाई बाविस्कर व सामाजिक कार्यकर्ते शामकांत बाविस्कर गेल्या पाच ते सात वर्षांपासून सातत्याने हा उपक्रम राबवत आहेत. रामनवमीपासून गलंगी येथून पायी यात्रेला सुरुवात होत असून कैलास देवराज यांच्या मार्गदर्शनाखाली महिला मंडळ, युवक-युवती व ग्रामस्थ मोठ्या श्रद्धेने गडाच्या दिशेने प्रस्थान करत आहेत. या सेवाभावी उपक्रमामुळे सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण निर्माण झाले असून भाविकांनी आयोजकांचे आभार मानले आहेत.